ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# समाज व्यवस्था व बदलते स्त्री जीवन : एक आढावा



नागदेव रामशास्त्री म्याना
संशोधक बी. एस्सी. , जे. ए. आय. आय .बी., एम. ए. (ए.आय.एच, सी & ए.)
रिसर्च स्कॉलर. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
डॉ. तुकाराम नारायण शिंदे
संशोधन मार्गदर्शक, एम.ए., सेट, पीएच.डी. प्राध्यापक व विभाग प्रमुख
( इतिहास विभाग ) ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर

## प्रस्तावना

समाजात स्त्रियांना समान हक्क, समान संधी आणि सर्वत्र सन्मान मिळणे साठी समाज सुधारकाकडून सर्व क्षेत्रांमध्ये जसे शिक्षण, व्यवसाय, राजकीय, कुटुंब, आणि समाज अशा सर्व ठिकाणी स्त्रियांना उन्नती करण्यातही प्रयत्न अखंडपणे सुरु आहेत. हे बदल सामाजीक न्याय, आर्थिक प्रगती, शिक्षण आणि आरोग्य आणि राजकीय सहभाग अशा सर्व क्षेत्रातून होत आहे आणि अजूनही मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. परंपरागत मानसिकता, रूढी, परंपरा, शिक्षणाचा अभाव, महिलांना कमी मोबदला, कौटुंबिक जबाबदारी अशा अनेक कारणानी त्यांना कमी लेखले जाते. स्त्रियांची उन्नती साधण्यासाठी महिलांचे शिक्षण आणि सशक्तीकरण, योग्य मोबदला, सर्वत्र संधी, कायदेशीर हक्क देणे, समाजातील सर्वांनी मानसिकता बदलणे असे विविध उपाय करावे लागतात.

जगात सर्वत्र त्यासाठी मोठा लढा उभारून महिलांना सर्व हक्क मिळवून देत आहेत. अजूनही जगाला या विषयी अजून मोठे कार्य करावे लागणार आहे. भारतात घटनेने पुरुष व स्त्री दोघानाही समान हक्क दिले आहेत. कालानुरूप त्यात अनेक सुधारणा करत आहेत. महिलांच्या उन्नतीसाठी सामाजिक अधिकार, आर्थिक मदत, आरोग्य सेवा , विविध क्षेत्रात महिलांना आरक्षण असे उपाय करत आहेत. महिलावर कोणत्याही प्रकारे अवमान करणाऱ्या विरुद्ध कायदेशीर सजा देण्याची तरतूद करण्यात येत आहे.

## विषयाचा अभ्यासाची गरज

महिलांची प्रगती हा प्राचीन काळापासून महत्वाचा विषय आहे. प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ, आधुनिक काळ तसेच विविध धर्म, जाती, पंथ, रूढी आणि भौगोलिक स्थान अशा विविध परिस्थिती प्रमाणे त्यात बदल होत गेला. सध्या जागतिक स्तरावर महिला स्वतःच्या हक्काबाबत जागरूक होत आहेत. त्या अनुषंगाने या विषयावर अभ्यास होणे व त्यावरून त्यांना अजून कोणत्या प्रकारे अधिकार प्राप्त करून देता येतील हे गरजेचे आहे.

## समस्या

महिलांची उन्नती हि निरंतर चालू राहणारी गोष्ट आहे. वैदिक काळापासून ही प्रक्रिया चालू आहे. काळाप्रमाणे बदल होत असला तरी मध्ययुगीन काळात त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने आली व बालविवाह , सती अशा प्रथा सुरु झाले. आधुनिक काळात स्त्रियांचे जीवन काहीसे सुखकर झाले तरी अजूनही खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. त्या दृष्टीने समस्या व त्यावरील उपाय अभ्यासणे आवश्यक आहे.

## उद्दिष्ट्ये

वेद , पुराण, प्राचीन, मध्ययुगीन तसेच आधुनिक संदर्भ पुस्तकातील माहिते घेणे.
विविध क्षेत्रातील महिलांचे प्रत्यक्ष मुलाखती घेणे. त्याचा सारांश अभ्यसाने.

## गृहीतके

सर्व संदर्भ पुस्तकातील माहिती विश्वसनीय आहे. महिलांच्या मुलाखतीत ते प्रत्यक्ष जीवनातील अनुभवावर कथन करतील. कोणतेही पूर्वग्रह दुषित असणार नाही.

## साहित्य व पुनरावलोकन

अनेक अभ्यासक, संशोधक यांनी लिहिलेले पुस्तकातील संदर्भ घेणे. त्यात कालानुरूप सुसूत्रता आणणे.

## संशोधनाची मर्यादा व व्याप्ती

भारतातील महिला यांच्यापुरती मर्यादा ठेवली आहे. सर्व क्षेत्रातील महिलांचा येथपर्यंत व्याप्ती आहे.

## प्राथमिक साधने

धर्मग्रंथ, पुराणे, प्रत्यक्ष मुलाखती , सरकारी ठराव

## दुय्यम साधने

संशोधक, लेखक यांची पुस्तके.

## संशोधन पद्धती

यासाठी विश्वसनीय संदर्भ ग्रंथ अभ्यास पद्धतीचा वापर करीत आहे. तळागाळातील गरीब महिला, कष्टकरी, लहान उद्योग , सरकारी अधिकारी, राजकीय, शिक्षण, वैद्यकीय, व्यापार , सामाजिक संस्था , गृहिणी , अशा विविध क्षेत्रातील महिलांचे मुलाखती घेणे. त्यांच्या मतांचे वर्गीकरण करून निष्कर्ष काढणे.

भारतात गरीब कष्टकरी महिला पासून उद्योगात यशस्वी तसेच लहान संस्थेच्या कार्यापासून ते नगरसेविका महापौर, आमदार. खासदार, पंतप्रधान , राष्ट्रपती अशा राजकीय क्षेत्रात यशस्वी झालेले महिला आहेत. साध्या नोकरीपासून मोठ्या सरकारी अधिकारी पर्यंत जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहेत. त्यांच्या चरित्राचा अभ्यास करणे.

## प्राचीन काळातील महिलांचे हक्क

प्राचीन भारतात महिलांना विविध हक्क आणि अधिकार मिळाले होते. कालांतराने समाजव्यवस्थेत बदल होत गेले आणि महिलांच्या हक्कांमध्येही परिवर्तन झाले. वेदकालीन, महाभारत - रामायणकालीन, बौद्ध - जैन काळ आणि मध्ययुगीन भारतात महिलांची स्थिती वेगवेगळी होती.

१. **वेदकालीन भारतातील महिलांचे हक्क समानतेचा कालखंड:** वैदिक काळात स्त्रियांना शिक्षण, संपत्तीचे स्वामित्व आणि समाजातील महत्त्वपूर्ण निर्णयांमध्ये सहभाग असायचा.वेदकालीन काळात महिलांना समाजात उच्च स्थान होते आणि त्यांना अनेक स्वातंत्र्य मिळाले होते. स्त्रियांना वेद, उपनिषद, आणि विविध विद्यांमध्ये पारंगत होता येत असे. गार्गी, मैत्रेयी, आणि लोपामुद्रा या विदुषींनी तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्रावर गहन चर्चा केल्या होत्या. स्त्रिया स्वतंत्रपणे यज्ञ करू शकत आणि धार्मिक विधींचा भाग बनू शकत होत्या. स्वयंपाक संस्कृतीनुसार स्त्रियांना स्वतःचा जोडीदार निवडण्याचा हक्क होता. महिलांना संपत्तीचे अधिकार होते आणि त्या आपल्या संपत्तीचे व्यवस्थापन करू शकत होत्या.

२. **रामायण आणि महाभारत काळातील महिलांचे हक्क:**सीतेला अनेक वेळा कठोर सामाजिक कसोटीला सामोरे जावे लागले, ज्यामुळे महिलांच्या प्रतिष्ठेवर मोठा भर दिला जात असे. परंतु कैकेयी आणि मंथरा यांसारख्या स्त्रिया राजकारणात प्रभावी भूमिका बजावत होत्या. द्रौपदीने आपल्या हक्कांसाठी लढा दिला, यावरून त्या काळात स्त्रियांना त्यांच्या हक्कांची जाणीव होती. कुंती आणि गांधारी या स्त्रिया राजघराण्यात असूनही कठीण परिस्थितीला तोंड देत होत्या.

३. **बौद्ध व जैन काल:** गौतम बुद्धाने महिलांसाठी भिक्षुणी संघ स्थापन केला, ज्यामुळे महिलांना धार्मिक आणि आध्यात्मिक शिक्षण घेण्याची संधी मिळाली. महिलांना समाजात थोडेसे अधिक स्वातंत्र्य मिळाले, विशेषतः शिक्षण आणि धर्मसाधनेत. जैन धर्मात स्त्रियांना संयम आणि साधनेचा अधिकार होता. अनेक स्त्रिया साध्वी म्हणून प्रतिष्ठित झाल्या आणि आध्यात्मिक जीवन जगल्या.[1] महिलांना धार्मिक विधींमध्ये भाग घेण्याची संधी होती. गार्गी, मैत्रेयी यांसारख्या विदुषी स्त्रिया होत्या.

४. **गुप्त आणि मध्ययुगीन भारतातील महिलांचे हक्क :**
समाज अधिक पितृसत्ताक बनला आणि स्त्रियांवरील निर्बंध वाढले. बालविवाह आणि सती प्रथेसारख्या प्रथा हळूहळू प्रस्थापित झाल्या. मुस्लिम राजवटीत महिलांना बंदिस्त जीवन जगावे लागले. राजघराण्यातील स्त्रियांना काही प्रमाणात शिक्षण आणि प्रशासनातील भूमिका मिळाली, पण सामान्य

[1] जैन धर्मात स्त्रियांना मोक्ष अप्राप्य आहे असे मानतात. संदर्भ : डॉ. गो. बं. देगलूरकर , प्राचीन भारत – इतिहास आणि संस्कृती अपरांत प्रकाशन २०१७, पान७८

स्त्रिया कठीण परिस्थितीत होत्या. मध्ययुगीन काळात स्त्रियांचे अधिकार कमी झाले, त्यांना घरातच मर्यादित ठेवले जाऊ लागले, बालविवाह, सतीप्रथा यांसारख्या कुप्रथा वाढल्या. मध्ययुगीन काळात स्त्रियांचे अधिकार कमी झाले, त्यांना घरातच मर्यादित ठेवले जाऊ लागले, बालविवाह, सतीप्रथा यांसारख्या कुप्रथा वाढल्या.

## ५. आधुनिक भारतातील महिलांचे जीवन

ब्रिटीशांनी दत्तक वारसा नामंजूर करून झाशी राज्य खालसा केली. राणी लक्ष्मीबाई,[2] बेगम हजरत महाल[3] अशा अनेकांनी रणांगणात पराक्रम गाजवला. याच काळापासून अजून पर्यंत इंग्लंड मध्ये राणीचा मान अतुच्च आहे. विसाव्या शतकात महिलांनी कर्मकांड करत आधुनिक शिक्षण घेतले व पुरुषाबरोबर समान हक्कासाठी लढा सुरु केला. स्वामी दयानंद सरस्वती यांनी विधवा विवाहाला प्रोत्साहन दिले. आर्य समाजाने मुले व मुली एका आहेत असे सांगून स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. बालविवाह, हुंडा, पडदा पद्धती, कायम वैधव्य, विधवांना हीन मानणे, देवदासी, मुलगी झाली म्हणून तिला लहानपणीच मारून टाकणे, बहुपत्नीत्व अशा स्त्रियांना अपमानकारक व त्रासदायक प्रथांचा विरोध केला.[4]

विधवा स्त्री समोरून गेल्यास अपशकून मानले जायचे. आंतरजातीय विवाह हा गंभीर स्वरूपाचा सामाजिक गुन्हा मानलाजायचा. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. स्त्रीजीवन चूल आणि मुल येथपर्यंत मर्यादित होते. तिला आचार विचाराचे स्वातंत्र्य नव्हते. सती पध्दत, बालविवाह, पडदा पध्दत, बहुपत्नीत्व, देवदासी आणि विधवांचे असह्य जीवन अशा अनिष्ट प्रथामुळे स्त्रीजीवन उद्ध्वस्त झाले होते. स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान मिळाले.[5] थिओसोफिकल सोसायटीने गुजरात येथे मुलींची शाळा सुरु केली. सत्यशोधक समाजाने बहुजन समाजातील मुलामुलींना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सुरु केली. अनेकांनी परदेशात शिक्षण घेऊन स्त्री पुरुष समानतेसाठी लढा उभा केला. राजा राममोहन रोय यांनी स्त्री हक्क व स्त्री पुरुष समानतेचा जोरदार पुरस्कार केला. भारतीय स्वातंत्र्य चालवलीत स्त्रियांनी सक्रीय सहभाग घेतला. बंगाल फाळणी विरोधी चालवलीत स्त्रियांचा सहभाग उल्लेखनीय होता. आझाद हिंद सेनेत महिलांची फलटण होती. राणी लक्ष्मीबाई, सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, अरुणा आसफ अली यांसारख्या अनेक महिलांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. मात्र, समाजाने त्यांना नेहमीच कुटुंबाच्या मर्यादेत ठेवण्याचा प्रयत्न केला. ब्राह्मो समाजाच्या प्रयत्नामुळे इ.स. १८२९ चा सती बंदीचा कायदा, इ.स. १८५६

---

[2] १७ जुने १९५७ रोजी ब्रिटीश सैन्यासोबत युध्दात राणी लक्ष्मीबाई हे धारातीर्थी पडले. संदर्भ: डॉ. टी, एन. शिंदे आधुनिक भारताचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन, २०१३ पान ६६.

[3] बेगम हजरत महाल या अवध राज्याचे नेतृत्व केले व ब्रिटीशाना शरण न जाता नेपाळमध्ये आश्रय घेतला. संदर्भ : संदर्भ: डॉ. टी, एन. शिंदे आधुनिक भारताचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन, २०१३ पान ६४.

[4] संदर्भ: डॉ. तुकाराम नारायण शिंदे , आधुनिक भारताचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन, २०१३ पान ९४

[5] कापड गिरण्यामध्ये महिलांना कमी दर्जाची हलकी कामे करण्यासाठी भरती करीत. त्यांची संख्याही नगण्य असे. संदर्भ : प्रा. विलास बेत, गिरणीतले दिवस, परिवर्तन अकादमी प्रकाशन, पान ६०

चा विधवा विवाह कायदा, इ.स. चा १८७२ चा सिविल विवाह कायदा, इ.स. १८७४ चा आंतरजातीय मिश्र विवाह कायदा हे स्त्री समाज जीवनावर प्रभाव टाकणारे कायदे मंजूर झाले. राजा राममोहन रोय यांनी सतीच्या प्रथेविरुद्ध चळवळ करून त्याला कायदेशीर मनाई ब्रिटीशांकाडून करून घेतली. विधवा पुनर्विवाह कायदा मंजूर केला. प्रार्थना समाजाने मुख्यता महाराष्ट्रात पडदा पध्दत, बालविवाह अशा स्त्री जीवन बंदिस्त्र करणाऱ्या व स्त्रियांचा विकास थांबवणाऱ्याप्रथांना विरोध केला व स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. आर्य समाजाने स्त्रियांना वेदाध्ययन याचा अधिकार आहे अशी भूमिका घेतली. स्त्रियांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी महाविद्यालयात प्रवेश दिले. बालविवाह पद्धती , लग्नात हुंडा देणे, विधवांना पुनर्विवाहास बंदी, विधवांना हीन मानणे, देवदासी, मुलींची जन्म झाल्याबरोबर ठार मारणे अशा वाईट प्रथांचा कडाडून विरोध केला व समाज प्रबोधन केला. विधवाश्रामाची स्थापना केली. म. ज्योतिबा फुले यांनी १८४८ मध्ये पुण्यात मुलींची शाळा सुरु केली. सावित्रीबाई फुले अशा अनेकानीं महिलांना शिक्षण मिळावे म्हणून मोठी चळवळ उभी केली. त्यांना समाजातील काहींनी विरोध केला तरी अनेक आधुनिक विचारसरणीचे समाज सुधारकांनी प्रोत्साहन दिले. थिओसोफिकल सोसायटीने गुजरातमध्ये मुलींची शाळा सुरु केली. दादाभाई नौरोजी यांच्या प्रयत्नाने ज्ञान प्रसारक सभेने मुंबईत मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरु केली. १९ व्या शतकात अपवाद वगळता बहुतेक महिला सर्व बाबतीत खूप मागे होते . महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य संग्राम चळवळीत महिलांनी हिरीरीने भाग घेतला. सुचेता कृपलानी , अरुणा असफ अली अशा महिलांनी चळवळीचे नेतृत्व केले. विसाव्या शतकात भारतीय स्वातंत्र्य लढ्यात भारतीय कॉंग्रेस सह अन्य पक्षांनी भाग घेतला. परंतु अपवादात्मक वगळता सर्वत्र सर्व पदावर पुरुषांची नेमणूक झाली आहे. १९३२ मध्ये ब्रिटीशानी निवडा मंडळ स्थापन केला व त्यात महिलांना काही जागा राखीव ठेवले. भारताच्या स्वातंत्र पूर्व काळात ब्रिटीश सरकारशी समन्वय साधण्यासाठी अनेक समित्या नेमले, परंतु कोठेही महिलांना प्रतिनिधित्व दिले गेले नाही. सरकारशी बोलणी करण्यासाठी सक्षम महिला नव्हते असे वाटते. देशाची फाळणी काळात जातीय दंगलीत महिलांवर अनेक अत्याचार झाले.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर घटनेने सर्व स्त्रियांना पुरुषाबरोबर समान मुलभूत हक्क दिले. स्वातंत्र्यानंतर भारतात स्त्रीसक्षमीकरणासाठी अनेक कायदे लागू करण्यात आले, जसे की हिंदू विवाह कायदा, संपत्ती हक्क कायदा, हुंडाबंदी कायदा, वगैरे. १९७५ मध्ये भारत सरकारने स्त्रियांच्या स्थितीबाबतचा अहवाल सादर केला, ज्यामुळे स्त्री-हक्क चळवळींना गती मिळाली आजही महिलांना वेतन असमानता[6], राजकीय प्रतिनिधित्वातील कमतरता, लैंगिक शोषण, घरगुती हिंसा आणि रूढीवादी बंधनांशी झगडावे लागते. स्त्री-मुक्ती चळवळ, महिला आरक्षण कायदा यासारख्या हालचालींमुळे महिलांच्या हक्कांसाठी जागरूकता वाढत आहे. महिलांचा कारखानदारी, तंत्रज्ञान, राजकारण आणि विज्ञान क्षेत्रात मोठा सहभाग वाढला. सरकारने महिलांसाठी विविध योजना आणि आरक्षण धोरणे लागू केली आहेत. डिजिटल माध्यमे आणि चित्रपट यांमधून स्त्रियांना वेगवेगळया भूमिकांमध्ये सादर केले जाते.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर महिलांनी अनेक क्षेत्रात कर्तृत्व सिध्द केले. इंदिरा गांधी हे भारताचे पंतप्रधान म्हणून कर्तृत्व सिद्ध केले. द्रौपदी मुर्मू हे सध्या राष्ट्रपती पदावर विराजमान आहेत. निर्मला

सीतारमण अर्थमंत्री पदावर आहेत. जयललिता, ममता बनर्जी, मायावती, वसुंधराराजे सिंधिया, शीला दीक्षित अशा अनेकांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून कार्य केले. गायन क्षेत्रात लता मंगेशकर, आशा भोसले व इतर अनेकांनी अजरामर गीते गायली. अभिनय, कला , क्रीडा अशा क्षेत्रात महिलांचा भरपूर योगदान आहे. किरण मुझुमदार-शॉ, फाल्गुनी नायर, वंदना लूथ्रा, राधिका गुप्ता, दिव्या गोकुलनाथ, ऋचा कर, अंजली बन्सल, शेहनाझ हुसेन, मल्लिका श्रीनिवासन अशा अनेक महिलांनी विविध क्षेत्रात स्वत उद्योग उभारून यशस्वी झाले. भारतीय प्रशासकीय सेवा ( किरण बेदी, टीना डाबी, अर्चना रामासुंदरम, रुची शर्मा), महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करून आपली क्षमता सिद्ध केला. शिक्षण क्षेत्रात शिक्षण मंत्री ( वर्षा गायकवाड ), संस्था चालक, विद्यादान, व्याख्याते , संशोधक आहेत. समाजसेवेत सिंधुताई सपकाळ यांच्यासारखे महान सेवा केलेल्या महिला आहेत. येथे उदाहरणे प्रातिनिधिक स्वरुपात आहेत.

तरीही अजूनही महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. सर्व क्षेत्र महिलासाठी राखीव जागा असल्यातरी त्यासाठी महिलांना सक्षम करण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करावी लागेल. आदिवासी, मागास, गरीब महिलांचे जीवन अजूनही कष्टप्रद आहे. पुरुषांची अशिक्षितपणा, व्यसनाधीनता[7], मागास मनोवृत्ती, कर्जबाजारीपणा[8] अशामुळे महिलांना कुटुंबातील कामाबरोबर आर्थिक भार उचलण्यासाठी कष्ट करावे लागते.

प्राचीन भारतात महिलांना काही प्रकारचे वारसा हक्क होते. मनुस्मृतीनुसार, विवाहित स्त्रियांना “स्त्रीधन” प्राप्त होत असे, जे त्या स्वतःच्या इच्छेनुसार वापरू शकत होत्या. पण कालांतराने हे अधिकार मर्यादित होत गेले आणि महिलांचे संपत्तीवरील स्वामित्व कमी झाले. महिलांच्या समानतेसाठी पुढील पावले उचलणे आवश्यक आहे. शिक्षण आणि आरोग्यावर अधिक भर देणे/ कामाच्या ठिकाणी समता सुनिश्चित करणे. स्त्रियांवरील हिंसाचाराविरोधात कठोर पावले उचलणे. राजकीय आणि सामाजिक प्रतिनिधित्व वाढविणे. अनेक स्त्रिया अजूनही कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे आपली करिअर सोडतात.

## निष्कर्ष:

समाज व्यवस्था सतत बदलत असते आणि त्याचा थेट परिणाम स्त्रीच्या जीवनावर होतो. बदलत्या काळानुसार स्त्रियांना अधिकाधिक संधी मिळत आहेत, परंतु अजूनही संपूर्ण समानता प्राप्त होण्यासाठी अनेक सुधारणा आवश्यक आहेत.

## संदर्भ :

१.डॉ. गो. बं. देगलूरकर , प्राचीन भारत – इतिहास आणि संस्कृती अपरांत प्रकाशन २०१७
२.डॉ. मधुकर केशव ढवळीकर , भारताची कुळकथा , राजहंस प्रकाशन , २०१८

[7] दारिद्र्यामुळे दिवसभर कष्ट करून थकून जाते. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या विवंचनेत व थकवा घालविण्यासाठी पुरुष व्यसनाधीन होत आहे. संदर्भ: प्रा. विजय यंगलवार, पद्मशाली समाजाचा इतिहास, श्री रेणुका प्रकाशन, २०२० पान १६०

[8] कामगारांची व्यसने , ओषधे, लग्न, शिक्षण, नवस फेडणे, सणवार अशा कारणासाठी गरिबांना कर्ज काढल्याशिवाय पर्याय नसे. : संदर्भ : प्रा. विलास बेत, गिरणीतले दिवस, परिवर्तन अकादमी प्रकाशन, पान ९०

३. डॉ. तुकाराम नारायण शिंदे , आधुनिक भारताचा इतिहास, अक्षरलेण प्रकाशन, २०१३
४. रं. ना. गायधानी , प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास , कॉन्टीनेन्तल प्रकाशन, २०१३
५. डॉ. रवींद्र साळुंके, मध्ययुगीन भारत, प्रशांत पब्लिकेशन, २०२०
६. प्रा. विजय यंगलवार, पद्मशाली समाजाचा इतिहास, श्री रेणुका प्रकाशन, २०२०
७. मुकुंदराज शिंगरम, पुणेकर पद्मशाली, श्रीपद्म प्रकाशन, २०२२
८. प्रा. विलास बेत, गिरणीतले दिवस, परिवर्तन अकादमी प्रकाशन,